


दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २९२ वा मंगळवार दि ३० डिसेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बोथेंची बडतर्फी तर झाली फौजदारी कारवाईचे भिजत घोंगडे राहणार का?

## इतर दोषी अधिकाऱ्यांवरही कारवाई होणे गरजेचे आरोग्य मंत्री या गंभीर प्रश्नांकडे आपले लक्ष केव्हा केंद्रित करणार

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयातील महाभ्रष्टाचारी भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांच्यावर अखेर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून बडतर्फीची कारवाई करण्यात आली. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनची वृत्तमालिका व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे चंद्रकांत खरात यांनी केलेला पाठपुरावा, यामुळे बोथे यांना जबरदस्त टोला बसला आहे. परंतु केवळ बोथेंची बडतर्फी ही पुरेशी नसून, या प्रकरणात आणखीही कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.कारण ही कठोर कारवाई झाल्यास यानंतर कोणी अशाप्रकारचा भ्रष्टाचार करण्यास धजावणार नाही. त्यामुळे आता पुढील त्यांची अवैध संपत्ती जप्तीची व फौजदारी कारवाई कधी होईल किंवा या कारवाईचे भिजत घोंगडे राहणार, हे येणाऱ्या काळातच स्पष्ट होणार आहे.लायकी नसतानाही भांडारपालसारख्या वरिष्ट पदावर पोहोचण्याचा विक्रम प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम अकोला गोरक्षण रोड परिसर यांनी केलेला आहे. अनेक प्रकारच्या तिकडमबाज्या करून आणि वरिष्ठांशी अर्थपूर्ण साटेलोटे करून पात्रता नसतानाही बोथेंनी भांडारपाल हे पद अक्षरशः बळकावले. त्यानंतर भ्रष्टाचारासाठी चटावलेल्या बोथे यांनी अत्यंत बेबंदपणे आणि बेशरमपणे भ्रष्टाचार केला. कुठलीही लाज-लज्जा, शरम बोथे यांनी भ्रष्टाचार करताना बाळगली नाही. जिल्हा रुग्णालयाचा भांडार विभाग आपल्या मालकीचे असल्याच्या अविर्भावात बोथेंनी भ्रष्टाचार केला. प्रकाश बोथे हे भ्रष्टाचारात एव्हढे रममाण झाले होते की, त्यांनी सातत्याने वरिष्ठांच्या आदेशांचीही अवहेलना केली. दुसरीकडे जिल्हा रुग्णालयात बसून जिल्हा रुग्णालयाला वाळवीसारखे पोखरण्याचे काम केले. त्यांनी कामकाज रेटताना अनेकदा नियमांना बगल दिली. अनेकदा वरिष्ठांच्या अधिकारांवर गदा आणून स्वतःचे भ्रष्टाचाराचे घोडे दामटले. एकीकडे विविध प्रकारची उपकरणे, वस्तूंच्या खरेदीत तर बोथेंनी

**महाभ्रष्टाचारी भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांनी भ्रष्टाचारातून कमावलेली करोडो रुपयांची चल अचल संपत्ती जप्त करून त्याची लिलाव करून येणारा पैसा शासन तिजोरीत जमा न केल्यास २४ जानेवारी २०२६ ला अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसणार**

भ्रष्टाचाराचा कहर केला, दुसरीकडे त्यांनी छपाईसारख्या कामात देखील भ्रष्टाचाराचा नवा फंडा शोधून काढला. तेथेही त्यांनी वित्तीय मर्यादेच्या बाहेर जाऊन खर्च करीत शासनाला चुना लावण्याचे काम केलेले आहे. शासनाने वस्तू खरेदीचे किंवा बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंटचे नियम आखून दिलेले आहेत, त्या नियमांची पायमल्ली केली. अव्वाच्या सव्वा दराने बिले मंजूर करवून त्यातून आपल्या मर्जीतील भ्रष्ट कंपन्यांचे उखळ पांढरे केले व त्यातून स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे काम केले. निविदा काढताना कुठलाही नियम पाळला नाही. साहित्य व उपकरणांच्या खरेदीत निविदा प्रसिद्धिपूर्वी खरेदी नियमावली नुसार प्रथम प्रशासकीय मान्यता निर्गमित करून नंतर खरेदी प्रक्रिया राबवणे आवश्यक असताना सक्षम प्राधिकारी यांची प्रशासकीय मान्यता न घेतचा निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. म्हणजे पदोपदी आणि पावलोपावली निर्लज्जपणे बोथेंनी भ्रष्टाचार केलेला आहे. बोथे यांच्या भ्रष्टाचाराने जिल्हा रुग्णालयासह त्याअंतर्गत येणाऱ्या इतर रुग्णालयांमध्ये इतका कहर माजवला की,अक्षरशः बुलढाण्याचे लोकप्रिय आमदार संजय गायकवाड आणि चिखलीच्या आमदार श्वेताताई महाले यांना हे मुद्दे थेट राज्य शासनापर्यंत नेऊन मांडावे लागले. परंतु तोपर्यंत प्रकाश नामदेव बोथे हे भ्रष्टाचार करून-करून इतके मस्तवाल झाले होते की, त्यांनी त्यानंतरही भ्रष्टाचार कमी केला नाही.प्रकाश नामदेव बोथे यांनी मुजोरी एव्हढी




वाढली होती की, त्यांच्या भ्रष्टाचारासंदर्भात चौकशी करण्यासाठी जी समिती आली होती, त्या समितीला त्यांनी कागदपत्रे देण्यास साफ नकार दिला. समितीकडे दस्तऐवज हस्तांतरित केले नाही. प्रकाश बोथे यांची कारकिर्द आणि त्यांचा भ्रष्टाचाराची पापं पाहता त्यांच्यावर आता बडतर्फीची कारवाई तर झालेली आहे.परंतु ही कारवाई पुरेशी नाही. बडतर्फीचीच कारवाई करण्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खरे तर खुप विलंब लावलेला आहे. येत्या काळात प्रकाश नामदेव बोथे यांनी भ्रष्टाचारातून करोडो रुपयांची जी अवाढव्य अवैध चल अचल संपत्ती कमावली आहे, ती त्वरित जप्त करून ती लिलाव करून येणारा सर्व पैसा शासन दप्तरी जमा करावी. तसेच त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचा खटला चालवावा. जोपर्यंत ही कारवाई होत नाही. तोपर्यंत जिल्हा रुग्णालय आणि आरोग्य विभागावर ताशेरे ओढण्याचे काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज करीत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात..

# मेहकर येथे रक्तरंजित थरार! पतीने पत्नीला व चार वर्षाच्या चिमुकल्याला केले ठार, हत्तेमागे चारित्र्याच्या संशयाची किनार

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्याला हादरवून टाकणारी घटना मेहकर येथील शिक्षक कॉलनी, प्रभाग क्रमांक १ मध्ये रविवारी रात्री सुमारे २ वाजताच्या सुमारास घडली. पत्नी व चार वर्षाच्या मुलाची हत्या या दुहेरी हत्याकांडाने संपूर्ण मेहकर शहर हादरून गेले असून,परिसरात भीती व हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेत रूपाली राहुल म्हस्के (वय ३०) व तिचा ४ वर्षीय मुलगा रियांश राहुल म्हस्के यांचा मृत्यू झाला आहे. आरोपी पतीचे नाव राहुल हरी म्हस्के (वय ३५) असे आहे. दरम्यान मेहकर पोलिसांनी आरोपी पतीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.हल्ल्यात रेहांश हा मुलगा जागीच मृत्युमुखी पडला, तर गंभीर जखमी झालेल्या रूपाली यांना शेजाऱ्यांनी तात्काळ एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात येत असताना जालना जवळ त्यांचा मृत्यू झाला असल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली आहे.राहुल म्हस्के, त्याची पत्नी रूपाली, मुलगा रियांश, वडील हरी गोविंद म्हस्के, आई ताराबाई हरी म्हस्के व आजी - असे एकूण




सहा जण शिक्षक कॉलनीतील घरात वास्तव्यास होते. रविवारी रात्री सर्वजण गाढ झोपेत असताना, पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या राहुल म्हस्केने अचानक घरात ठेवलेली कुऱ्हाड उचलली आणि झोपेत असलेल्या पत्नी रूपाली व मुलगा रियांश यांच्या डोक्यावर वार करून अतिशय धक्कादायक व मन हेलावून टाकणारी निर्दयी पतीने पत्नीची तर बापाने मुलाची हत्या केली. घटनेची माहिती मिळताच मेहकर उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे, ठाणेदार व्यंकटेश्वर आलेवार, तसेच पोलीस अधिकारी संदीप बिराजे, अवचार, नरवाडे, खाडे हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सोमवारी सकाळी अप्पर पोलीस अधीक्षक लोढा यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलीसांनी आरोपी राहुल मस्के यास ताब्यात घेतले असून,पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असल्याची माहिती ठाणेदार व्यंकटेश आलेवार यांच्याकडून प्राप्त झाली. घटनेमागील नेमके कारण, संशयाची पाश्वभूमी व मानसिक स्थिती याबाबत चौकशी करण्यात येत आहे. अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

# शिक्षकांची कठीण परीक्षा!

## संपादकीय लेख

शिक्षकांची ‘कठीण’ परीक्षा



देश महासत्ता होण्याचा मार्ग शाळा महाविद्यालयांमधून जातो असे गोडवे अनेकदा गायले जातात, मात्र वाढत्या बेरोजगारीमुळे आधीच विद्यार्थी पालकांमध्ये अस्वस्थता आहे. आता टीईटीच्या नावाखाली शिक्षकांनाही या रांगेत उभे केले जात आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये अनामिक भीती निर्माण करण्यापाठीमागे व्यवस्थेचे काहीही हेतू असले तरी विद्यार्थी शिक्षकांमध्ये असलेली अस्वस्थतता शिक्षणाच्या अनास्थेत रूपांतरित झाल्यास याची मोठी किंमत समाजाला मोजावी लागेल. सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी देशभरात एक ते आठ वर्गातील सर्व शिक्षकांनी दोन वर्षांमध्ये शिक्षक पात्रता परीक्षा टीईटी उत्तीर्ण करावी अन्यथा सेवानिवृत्ती घ्यावी असा निर्णय दिला. सेवेची केवळ पाच वर्षे उरलेल्या शिक्षकांना देखील पदोन्नतीसाठी टीईटी परीक्षा अनिवार्य करण्यात आले आहे. सेवानिवृत्ती लाभासाठी विहित सेवा पूर्ण न झालेल्या शिक्षकांनी टीईटी उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवानिवृत्तीचे लाभ घेण्यासाठी राज्य शासनाची विशेष अनुमती घ्यावी लागेल, असाही निर्णय दिलेला आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्र राज्यासह देशभरातील कार्यरत व सेवेत कायम झालेले शिक्षक हवालदिल झाले आहेत . वास्तविक महाराष्ट्र राज्यातील कार्यरत प्राथमिक शिक्षकांच्या नियुक्त्या व त्यांच्या पदोन्नती राज्य शासनाच्या प्रचलित सेवाशर्ती व नियमानुसार झालेल्या आहेत. राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उदाहरणार्थ जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रांमधील शिक्षक नियुक्त्यांसाठी प्रचलित नियमानुसार प्रक्रिया राबवली आहे. यामध्ये शासनमान्य शिक्षण शास्त्र पदविका उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षांचा डीएड अभ्यासक्रम पूर्ण करून राज्य शासनामार्फत परीक्षा मंडळाच्या वतीने परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा घेण्यापूर्वी दोन वर्षांच्या कालावधीत शिक्षकांचे व्यावसायिक कौशल्य विकसित होण्यासाठी विषय ज्ञान मूल्यमापन, प्रायोगिक अध्यापन, प्राथमिक अध्यापनासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य निर्मिती, मुलांचे मानसशास्त्र अशी विविध व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी दोन वर्षे सातत्याने प्रात्यक्षिके संबंधित विद्यालयामार्फत घेतली जातात. त्यानंतर परीक्षा मंडळामार्फत डीएड अभ्यासक्रमाची लेखी परीक्षा घेतली जाते व तिचा निकाल जाहीर होऊन उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना शिक्षणशास्त्र पदविका प्रमाणपत्र दिलेली आहेत शिक्षण शास्त्र पदविकेमधील उत्तीर्ण उमेदवारांमधून शासन रिक्त पदांच्या गरजेनुसार गुणवत्तेनुसार तत्कालीन विहित मार्गाने शिक्षक नियुक्त केले आहेत. उदाहरणार्थ १९९०-९३ या काळामध्ये राज्य शासनाने प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ स्थापन करून या निवड मंडळाच्या मार्फत स्वतंत्र परीक्षेचे आयोजन करून त्यामधील गुणवत्तेनुसार उमेदवारांची नियुक्ती केली आहे. १९९५च्या काळात जिल्हा निवड मंडळामार्फत शिक्षक नियुक्ती केले आहेत. २००५ मध्ये जिल्हा परिषद शिक्षण सेवक निवड समितीमार्फत शिक्षण सेवक नियुक्त केले आहेत. २००८ ते १० या काळामध्ये परीक्षा परिषदेमार्फत सीईटी परीक्षेचे आयोजन करून त्यामधील गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. २०१३ पासून एनसीटीईच्या निर्देशाप्रमाणे शिक्षक पात्रता परीक्षा टीईटीचे आयोजन करून पात्र उमेदवारांची शिक्षक नियुक्ती करण्यात आली आहे . केंद्र शासनाने बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार हा कायदा १ एप्रिल २०१० पासून लागू केला. या कायद्यामध्ये कलम २३(१ )च्या प्रयोजनासाठी शिक्षक पदावरील व्यक्तींची किमान अर्हता अधिसूचित विद्या विषयक प्राधिकरणाने निश्चित करावी, असे निर्देश होते. त्यानुसार केंद्र सरकारने शिक्षकांची किमान अर्हता निश्चित करण्यासाठी एसीटीई अर्थात राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद ३१ मार्च २०१० रोजी स्थापन केली . राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने २३ ऑगस्ट १० व २९ जुलै २०११ च्या अधिसूचनेनुसार प्राथमिक शिक्षकांकरिता किमान अर्हता निश्चित करून शिक्षक पात्रता परीक्षा असणे अनिवार्य केले आहे. महाराष्ट्र शासनाने प्राथमिक शिक्षकांकरीता इयत्ता १ ते ८ वर्गासाठी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता शिक्षक पात्रता अनिवार्य करण्याबाबत १३ फेब्रुवार, २०१३ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध केला. या निर्णयाच्या प्रसिद्धी दिनांकापासून पुढील सर्व प्राथमिक शिक्षकांसाठी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व शिक्षक पात्रता अनिवार्य करण्यात आली. या शासन निर्णयानुसार टीईटी शासन निर्णयाच्या पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांसाठी टीईटी अनिवार्य करण्यात आलेली नव्हती . टीईटी अनिवार्यतेच्या शासन निर्णयानंतर झालेल्या शिक्षक नियुक्त्या या शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्यांच्याच करण्याबाबत शिक्षकांची सहमती आहे. त्यानुसार २०१३ नंतरच्या नियुक्तीसाठी शिक्षण हक्क अधिनियम व एनसीटीईच्या शिक्षक पात्रता निर्णयाची अंमलबजावणी पुढील काळात झालेली आहे. राज्य शासनाने यापूर्वी कोणत्याही पत्रांन्वये २०१३ पूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटी अनिवार्य केलेली नाही. मात्र आता अचानक सेवेत कायम असणाऱ्या शिक्षकांना टीईटी अनिवार्य केल्याने शिक्षकांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# युतीची 'डेडलाईन' ठरली! प्रताप सरनाईकांचा भाजपला अल्टिमेटम; मैत्री टिकणार की तुटणार?



**मिरा-भाईंदर :** मिरा- भाईदर पालिका निवडणूकीतील भाजप- शिवसेनेची युती कारण्याबाबत शुक्रवारी बैठक पार पडली. त्यावर मागील दोन दिवसांपासून भाजपकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे युतीबाबत निर्णय घेण्यासाठी पुढील २४ तासांचा अल्टिमेटम भाजपाला शिवसेनेकडून आता देण्यात आला आहे. अन्यथा स्वतंत्र लढण्याची भूमिका शिवसेनेचे नेते आणि मंत्री प्रताप सरनाईक यांनी रविवारी मांडली. राज्यातील विविध महापालिका युती म्हणून एकत्र लढण्यासंदर्भात निर्णय झाला असला तरी मिरा-भाईदर मध्ये चर्चा देखील मागील अनेक दिवसांत सुरू झाली नव्हती.याउलट दोन्ही पक्षांकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी सुरू होत्या. यातून युती न होण्याचे संकेत दिसत होते. यातच बुधवारी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मिरा-भाईदर पालिका निवडणुका युती म्हणून एकत्र लढण्यासाठी शिवसेना आणि भाजप च्या प्रत्येकी तीन नेत्यांची समन्वय समिती स्थापन केली आहे.त्यानंतर युतीच्या चर्चेची दरवाजे दोन्ही बाजूने खुली झाली आहेत. शुक्रवारी सरनाईक व स्थानिक भाजपचे आमदार नरेंद्र मेहता यांची भाजप कार्यालयात बैठक पार पडली होती. यावेळी जागावाटपावर केवळ प्राथमिक चर्चा पार पडली होतो.त्यावर ठोस असा कोणताच निर्णय घेण्यात आला नव्हता. याला दोन दिवसांचा कालावधी उलटला असला तरी भाजपकडून युती कारण्याबत प्रतिसाद मिळाला नसल्याची माहिती सरनाईक यांनी रविवारी दिली.उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अवघे दोन दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे येत्या २४ तासात युतीबाबत भाजपकडून सकारात्मक प्रतिसाद मिळण्याची वाट पाहिली जाणार आहे. अन्यथा पुढील निर्णय म्हणजेच अप्रत्यक्ष स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले.भाजपने युती करण्यासाठी तीन अटी शर्ती ठेवल्या होत्या. यात मिरा रोड येथील शिवार गार्डनच्या आरक्षित भूखंडाचा समावेश होता. याबाबतच्या ठरावावर स्वतः मेहता यांच्या स्वाक्षऱ्या असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. तसेच त्यांनी भाजपचे ज्याप्रमाणे काही कार्यकर्ते शिवसेनेत घेतले आहेत. त्याचप्रमाणे आमचे काही माजी नगरसेवकांना भाजपने घेतले असल्याचा मुद्दा ही सरनाईक यांनी मांडला.जागा वाटपात लहान भाऊ म्हणून जागा स्वीकार करण्यास तयार आहेत.मात्र अस्तित्वात असलेल्या माजी नगरसेवकांच्या तुलनेत कमी जागा दिला तर ते चालणार नाहीत असे ही ते म्हणाले.

## नाशिकमध्ये भाजपला हव्यात सर्वाधिक जागा, नाहीतर स्वबळावर लढणार



**नाशिक :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे वारे नाशिकमध्येही वेगाने वाहू लागले आहेत. नाशिक म हानगरपालिकेच्या एकूण १२२ जागांसाठी महायुतीमधील तीनही पक्षांमध्ये रस्सीखेच सुरू झाली असून, युतीचं घोडं सध्या जागावाटपावर अडकल्याचं चित्र आहे. भाजप शहराध्यक्ष सुनील केदार यांनी मांडलेल्या प्रस्तावामुळे नाशिकच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

नाशिकमध्ये भाजपची ताकद मोठी आहे, हे गेल्या २०१७ च्या निवडणुकीत स्पष्ट झाले होते, जेव्हा भाजपने ६६ जागा जिंकत एकहाती सत्ता मिळवली होती. आता पुन्हा एकदा भाजपने आपली पकड मजबूत करण्यासाठी १२२ पैकी तब्बल ८५ जागांची मागणी केली आहे. सुनील केदार यांच्या मते, भाजपमध्ये इच्छुकांची संख्या १,१०० च्या पार गेली असून, इलेक्ट्रिव्ह मेरिट असलेल्या उमेदवारांनाच संधी मिळावी, अशी भाजपची भूमिका आहे.नाशिकमध्ये महायुतीमधील मित्रपक्षांनीही आपला दावा ठाम ठेवला आहे. भाजपने ८५ जागा, शिंदे सेना ४५ जागा तर अजित पवार गट (राष्ट्रवादी) ३० जागांवर दावा केला आहे. विशेष म्हणजे, या तीनही पक्षांच्या मागण्यांची बेरीज १६० वर जाते, तर उपलब्ध जागा फक्त १२२ आहेत.यामुळे जागावाटपाचा तिढा सुटणे कठीण झाले आहे. शिंदे सेनेने नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकांमध्ये जिल्ह्यात चांगली कामगिरी केल्याने ते ४५ जागांवर अडून बसले आहेत. २०१७ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने थेट ६६ जागा जिंकून नाशिकचा गड सर केला. आताच्या परिस्थितीत, नाशिकमध्ये भाजपची संघटनात्मक ताकद मोठी असली तरी, शिंदे गटाकडे गेलेले जुने शिवसैनिक आणि छगन भुजबळांच्या रूपाने राष्ट्रवादीची ताकदही मोठी आहे.

## पुण्यात महाविकास आघाडीत फूट?

**पुणे :** पुण्यात महाविकास आघाडीच्या गोटात प्रचंड हालचाली सुरु आहेत. पुणे महापालिका निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ही अवघ्या दोन दिवसांवर आहे. असं असलं तरीही महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला अद्याप निश्चित झालेला नाही. विशेष म्हणजे पुण्यात ठाकरे गट आणि काँग्रेसच्या सातत्याने बैठका पार पडत आहेत. या बैठकांमध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते देखील सहभागी झाले होते. पण आता वेगळंच काहीतरी घडताना दिसत आहे.महाविकास आघाडीच्या आजच्या महत्त्वाच्या बैठकीला शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या नेत्यांनी दांडी मारली. विशेष म्हणजे ठाकरे गट आणि काँग्रेसच्या नेत्यांनी शरद पवारांच्या पक्षाच्या नेत्यांना फोन करुन संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता ते नॉट रिचेबल होते. त्यामुळे शरद पवारांच्या पक्षाला महाविकास आघाडीत निवडणूक लढवण्याची नाही का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## मुंबईत ठाकरे बंधूंना पवारांची साथ; ५२ नाही, तर 'इतक्या' जागांवर लढणार.



**मुंबई :** आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई महापालिकेच्या रणांगणात आता मराठी अस्मिता आणि अनुभवाची सांगड पाहायला मिळणार आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीनंतर आता शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही या आघाडीत सामील होण्याचा निर्णय घेतल्याने महायुतीसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी राज्याच्या राजकारणात ही आणखी एक मोठी उलथापालथ झाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, शरद पवार यांच्या पक्षाने सुरुवातीला ५२ जागांची मागणी केली होती. मात्र, प्रदीर्घ चर्चेअंती अखेर १० जागांवर तडजोड करण्यात आली आहे. उबाठा-मनसे आघाडीने राष्ट्रवादीला १० जागा सोडल्या असून, या जागांवर राष्ट्रवादीचे वजनदार उमेदवार मैदानात उतरवले जाणार आहेत. उमेदवारांची अधिकृत यादी लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.मुंबई महापालिकेवर गेली तीन दशके शिवसेना (संयुक्त) आपले वर्चस्व टिकवून होती. मात्र, पक्षातील फुटीनंतर यंदाची निवडणूक अत्यंत चुरशीची ठरणार आहे. शिवसेना (उबाठा)चा आजही मुंबईतील मध्यम वर्गीय आणि मराठी मतदारांमध्ये मोठा प्रभाव आहे. तर दुसरीकडे मनसे म्हणजे राज ठाकरेंची आक्रमक शैली आणि तरुण वर्गातील आकर्षण युतीसाठी फायदेशीर ठरू शकते. त्याचवेळी शरद पवारांच्या राष्ट्रवादीची मुंबईतील ताकद मर्यादित असली तरी, काही विशिष्ट ईशान्य मुंबईसारख्या पट्ट्यांमध्ये शरद पवारांना मानणारा मोठा वर्ग आहे.ठाकरे बंधू एकत्र आल्यामुळे मराठी मतांचे होणारे विभाजन थांबणार आहे.

## महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेस-वंचितची युती जाहीर, कोणाला किती जागा?



**मुंबई :** राज्यातील २९ म हानगरपालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु असून, मुंबईत सर्वात मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी अखेर काँग्रेस आणि प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीची युती अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे. आज झालेल्या पत्रकार परिषदेत या दोन्ही पक्षांनी एकत्र लढण्याचा निर्धार व्यक्त केला.या नव्या समीकरणानुसार, जागावाटपाचा आकडाही समोर आला आहे. मुंबईत काँग्रेस तब्बल १५६ जागांवर आपले उमेदवार उभे करणार आहे असं सांगितलं जात आहे. तर वंचित बहुजन आघाडीला ६२ जागा देण्यात आल्या आहेत. याची बद्दलच अधिकृत्र पत्रकही वंचितच्या सोशल मीडियावरुन शेअर करण्यात आलं आहे. सध्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सोबतही चर्चा सुरू असली, तरी सध्या त्यांना केवळ ९ जागांचा प्रस्ताव दिला असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे ते स्वबळावर लढण्याची शक्यता राजकीय वतुर्ळात आहे.दुसरीकडे, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनीही युती केल्याने मुंबईत 'मराठी व्होट बँक' विरूद्ध 'महायुती' आणि 'काँग्रेस-वंचित' असा त्रिकोणी संघर्ष पाहायला मिळणार आहे. पुण्यात मात्र महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात थेट लढत होण्याची चिन्हे आहेत. या सर्व घडामोडींमुळे मुंबईच्या महापौरपदावर कोण बसणार, याकडेही संपूर्ण राज्याचे लक्ष असणार आहे.त्यामुळे आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची ऐतिहासिक युती अखेर निश्चित झाली आहे. सोशल मीडियावर जारी करण्यात आलेल्या अधिकृत पत्रकानुसार, मुंबईतील एकूण २२७ जागांपैकी ६२ जागांवर वंचित बहुजन आघाडी आपले नशीब आजमावणार आहे.या निर्णयाला वंचितचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी ऑनलाइन बैठकीद्वारे हिरवा कंदील दाखवला आहे. विशेष म्हणजे, या ६२ जागांच्या यादीवर दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या स्वाक्षऱ्या असून, यात आता कोणताही बदल होणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने वॉर्ड क्र. ६, ११, १२, ८४, ९५, १२७, १५३ आणि २२५ यांसारख्या महत्त्वाच्या मतदारसंघांचा समावेश 'वंचित'साठी करण्यात आला आहे.

वंचित काँग्रेसमधील युतीमुळे दलित, मुस्लिम, बहुजन मतांचं विभाजन टाळता येणार आहे. ज्याचा या दोन्ही पक्षांना मोठा फायदा होऊ शकतो. या युतीमुळे मुंबईतील राजकीय समीकरणांमध्ये मोठी उलथापालथ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ज्या मंदिरात २२ दिवसांपूर्वी लग्न केलं तिथेच जोडप्याने जीव दिला; भयंकर शेवट पाहून गाव हळहळलं

**लखनौ :** ज्या मंदिरात काही दिवसांपूर्वी लग्न केलं. त्याच मंदिरात एका जोडप्याने आपल्या आयुष्याची अखेर केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. उत्तर प्रदेशातील सीतापूर जिल्ह्यात ही अत्यंत दुःखद घटना घडल्याची माहिती आहे. रविवारी सकाळी हरगाव पोलीस स्टेशन परिसरातील अनिया कला येथील प्रसिद्ध महामाई मंदिराच्या परिसरात एका नवविवाहित जोडप्याचे मृतदेह झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे, फक्त २२ दिवसांपूर्वीच या जोडप्याने याच मंदिरात लग्न करुन नवीन जीवन सुरू केले होते. आता त्यांनी त्याच ठिकाणी या जोडप्याने एकाच दोरीला गळफास घेऊन आपले जीवन संपवले.मृतांची ओळख २२ वर्षीय खुसीराम आणि त्याची



१९ वर्षीय पत्नी मोहिनी अशी झाली आहे. हे बस्ती पूर्वा, लहारपूर येथील रहिवासी आहेत. मिळालेल्या अधिक माहितीनुसार, खुसीराम आणि मोहिनी यांचे दीर्घकाळापासून प्रेमसंबंध होते. ते दूरचे नातेवाईक होते आणि त्यांना लग्न करण्याची इच्छा होती. परंतु सुरुवातीला दोन्ही कुटुंबं या नात्याला विरोध करत होती. कुटुंबाच्या विरोधाला न जुमानता, त्यांनी ६ डिसेंबर रोजी घर सोडलं आणि हरगाव येथील महामाई मंदिरात वैदिक पद्धतीने लग्न केले.लग्नानंतर अनेक दिवस दोन्ही कुटुंबांमध्ये तणाव आणि नाराजी होती. मात्र, पोलिसांच्या म्हणण्यानुसार कालांतराने गोष्टी सामान्य होऊ लागल्या आणि कुटुंब हे नाते स्वीकारण्यास तयार झाले. लग्नानंतर खुशीराम त्याची पत्नी मोहिनीसोबत त्यांच्या लहरपूर येथील घरात राहत होता. बाहेरून सर्व काही सामान्य वाटत होते, परंतु अचानक झालेल्या या घटनेने सर्वांना धक्का बसला आहे.

रविवारी सकाळी गावकरी पूजेसाठी महामाई मंदिरात पोहोचले तेव्हा तेथील दृश्य भयावह होते. मंदिराच्या आवारातील एका जुन्या झाडाला पती-पत्नीचे मृतदेह एकाच दोरीला गळफास घेतलेले होते. घटनास्थळी मोठी गर्दी जमली आणि संपूर्ण अनिया कला गाव हादरून गेले. ग्रामस्थांनी तात्काळ हरगाव पोलिस ठाण्याला माहिती दिली.याप्रकरणाची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. हरगावचे निरीक्षक बलवंत शाही यांनी सांगितले की, मृतदेह फासावरून खाली काढण्यात आले आहेत. पंचनामा करण्यात आला आणि ते शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहे. घटनास्थळी पोहोचताच कुटुंबीयांनी एकच आक्रोश केला. लग्नाच्या २२ दिवसांनंतर नवविवाहित जोडप्याने हे भयानक पाऊल का उचलले याचा सखोल तपास पोलिस करत आहेत.

या दोघांनी हे टोकाचं पाऊल का उचललं याचा तपास सुरु करण्यात आला आहे. यामागे मानसिक ताण, कौटुंबिक तणाव किंवा इतर काही कारणं आहेत का हे सध्या स्पष्ट झालेले नाही. पोलिसांच्या मते, शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमकं कारण आणि वेळ उघड होईल. या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# किरकोळ वादातून अनर्थ, नशेत महिलेवर हल्ला, वाचवायला गेलेल्या लेकीलाही मारहाण

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील उमरेड शहरात काल शनिवारी दुपारी घडलेल्या दुहेरी हत्याकांडाने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. गांगापूर कालवा परिसरातील झोपडपट्टीत दारूच्या नशेत असलेल्या शेजाऱ्याने किरकोळ वादातून माय-लेकींच्या डोक्यावर लाकडी दांड्याने जोरदार वार करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत पार्वता शंकर फुकट (वय ६५) आणि त्यांची मुलगी संगीता वसंता रिठे (वय ४०), दोघीही रा. गांगापूर, उमरेड यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या प्रकरणातील आरोपी नितेश किसन ठाकरे (वय ३१), रा. गांगापूर झोपडपट्टी, उमरेड याला पोलिसांनी तात्काळ अटक केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी आणि मृतक माय-लेकी शेजारी राहत होते. आरोपी नितेशला दारूचे व्यसन असून तो नशेत वारंवार शेजाऱ्यांशी वाद घालत असल्याची माहिती आहे. यापूर्वीही आरोपी आणि मृतकांमध्ये अनेकदा वाद झाले होते. काल शनिवारी दुपारी सुमारे १२.३० वाजताच्या सुमारास गांगापूर झोपडपट्टीतील मृतकांच्या राहत्या घरासमोर आरोपी नितेश आणि पार्वता फुकट यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. हा वाद पाहता पाहता विकोपाला गेला. वादाच्या भरात दारूच्या नशेत असलेल्या नितेशने जवळच असलेला लाकडी दांडा उचलला आणि पार्वता फुकट यांच्या डोक्यावर जोरदार वार केला. यात आईचा आवाज ऐकताच आईला वाचवण्यासाठी मुलगी संगीता रिठे तीला वाचवण्यासाठी मध्ये पडली असता आरोपीने तिच्याही डोक्यावर वार केले. या हल्ल्यात दोघीही रक्ताच्या थारोळ्यात खाली पडल्या आणि घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच उम



रेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनाजी जळक यांच्यासह पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले. याप्रकरणी फिर्यादी सौ. स्मिता पंकज जुमडे (वय ३६) यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (१) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.आरोपी नितेश ठाकरे याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक धनाजी जळक यांच्या मार्गदर्शनाखाली उमरेड पोलीस करीत आहेत. भरदिवसा घडलेल्या या दुहेरी हत्याकांडामुळे उमरेड शहरासह संपूर्ण नागपूर जिल्ह्यात खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# कळंबोलीत नऊ महिने पोटात वाढवलेल्या लेकीला आईनेच संपवलं

**रायगड :** कळंबोली उपनगरात माणुसकीला काळीमा फासणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. कळंबोली सेक्टर-१ मधील गुरूसंकल्प हाऊसिंग सोसायटीत जन्मदात्या आईनेच आपल्या सहा वर्षांच्या चिमुरडीची हत्या केल्याचा प्रकार उघड झाला आहे. प्राथमिक चौकशीत समोर आलेल्या माहितीनुसार, या आईचे हे कृत्य अत्यंत क्षुल्लक कारणांवर आधारित होतेसुप्रिया प्रमोद म्हामुणकर (वय ३०) असे आरोपी महिलेचे नाव असून तिला मुलगा हवा होता. मुलीला जन्म झाल्यापासूनच सुप्रियाने तिचा तिरस्कार सुरू केला होता. पोलीस तपासात असे समोर आले की, सुप्रियाला मुलगी 'अशी नको' वाटत होती, ती व्यवस्थित बोलत नव्हती आणि हिंदी भाषेत बोलत असल्यामुळे त्रास होत होता. अनेकदा तिने पतीकडे 'मला अशी मुलगी नको, ती नीट बोलत नाही' असे सांगितले होते, असे तपासात समोर आले आहे. सुप्रियाचा पती मुलीबद्दल तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न करत होता, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. अखेर २३ डिसेंबरच्या रात्री सुप्रियाने मुलीला




संपविण्याचा निश्चय केला. त्याच दिवशी मुलीला भेटण्यासाठी तिची आजी भेटवस्तू घेऊन घरात आली होती; मात्र मुलीची आणि आजीची भेट होऊ शकली नाही. सकाळी, पती घरी परतल्यानंतर झोपलेली मुलगी उठत नसल्याचे लक्षात आल्यावर त्याने तातडीने रुग्णालयात धाव घेतली. सुरुवातीला रुग्णालयाने हृदयविकाराचा झटका आलेला असल्याचे बनाव केले, परंतु कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांना संशय वाटल्याने त्यांनी विशेष शवविच्छेदन करण्याची विनंती केली.पोस्टमार्टम अहवालात श्वसनमार्ग अडथळ्याचे संकेत मिळाल्यामुळे आई-वडिलांची कसून चौकशी करण्यात आली. सुमारे सहा तासांच्या चौकशीनंतर सुप्रियाने मुलीचा खून केल्याची कबुली दिली. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

# खारघरमध्ये मद्यधुंद तरुणाचं तांडव; नागरिकांनी दिला प्रसाद

**नवी मुंबई :** नवी मुंबईच्या खारघर परिसरात शनिवारी रात्री मद्यधुंद तरुणाने घातलेल्या धिंगाण्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. खारघरमधील गोल्ड कॉईन वाईन मार्ट या वाईनशॉपमध्ये दारूच्या नशेत असलेल्या तरुणाने घुसखोरी करत मोठ्या प्रमाणावर तोडफोड केल्याची धक्कादायक घटना घडली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले अनब व्यापाऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली होती.सदर प्रकरणामध्ये मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुण रात्री उशिराच्या सुमारास वाईनशॉपसमोर आला. तो पूर्णपणे मद्यधुंद अवस्थेत असल्याने त्याचे वर्तन आक्रम




क होते. काही क्षणातच त्याने दुकानात प्रवेश करत लाकडी बांबूच्या सहाय्याने नामफलक, काचा तसेच दुकानातील साहित्याची जोरदार तोडफोड सुरू केली. या दरम्यान तरुण मोठ्याने ओरडत शिवीगाळ करत असल्याने परिसरात एकच गदारोळ माजला. रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांनी हा प्रकार पाहताच घटनास्थळी गर्दी केली.परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे लक्षात येताच स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी हस्तक्षेप केला. यावेळी संतप्त नागरिकांनी धाव घेत मद्यधुंद तरुणाला रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र तो अधिकच उग्र होत असल्याने अखेर नागरिकांनी त्याला चोप देत ताब्यात घेतले. त्यानंतर तात्काळ खारघर पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. संबंधित घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच या तरुणाला आपल्या ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची वैद्यकीय तपासणी करून त्याच्याविरोधात सार्वजनिक शांतता भंग , मालमत्तेची तोडफोड तसेच दारूच्या नशेत गोंधळ घालणे यासंदर्भात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून तरुणाने हा प्रकार नेमका का केला, याचा शोध पोलिस घेत आहेत.

या घटनेमुळे खारघर परिसरातील व्यापारी व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. रात्रीच्या वेळी अशा प्रकारच्या घटना घडत असल्याने सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मद्यधुंद अवस्थेत सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# फॉर्ममध्ये असूनही ऋषभ पंत न्यूझीलंडविरुद्ध मालिकेतून ड्रॉप होणार?

**मुंबई :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका ११ जानेवारी ते १८ जानेवारी या कालावधीत खेळवली जाईल. न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. आता या संघात कोणाला संधी मिळेल आणि कोणाला डच्चू मिळणार याकडे चाहत्यांच्या नजरा असतील.या महिन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन साम न्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी ठळीहरलह झरपीं भारतीय संघात निवड झाली होती. तो एकही सामन्यासाठी अंतिम अकरा जणांमध्ये स्थान मिळवू शकला नाही. पंतला भारताच्या एकदिवसीय संघातून वगळले जाऊ शकते. सध्या, पंत विजय हजारे ट्रॉफीमध्ये दिल्लीचे नेतृत्व करत आहे. २८ वर्षीय ऋषभ पंत हा कसोटी क्रिकेटमध्ये भारताचा पहिला पसंतीचा यष्टिरक्षक असला तरी, त्याला भारताच्या एकदिवसीय आणि टी-२० संघात खूप कमी संधी मिळतात. ऋषभ पंतने भारतासाठी शेवटचा एकदिवसीय सामना ७ ऑगस्ट २०२४ रोजी कोलंबो येथील आर. प्रेमदासा स्टेडियमवर श्रीलंकेविरुद्ध खेळला होता. आता इशान किशनला या संघात जागा मिळू शकते.

बीसीसीआय निवड समिती या आठवड्यात तीन एकदिवसीय सामन्यांसाठी भारताचा संघ जाहीर करण्याची अपेक्षा आहे. शुभमन गिल हा भारताचा एकदिवसीय कर्णधार आहे आणि मानेला झालेल्या दुखापतीमुळे तो दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेला म ुकला होता. तो आता बरा झाला आहे आणि किवींविरुद्ध भारताचे नेतृत्व करण्यासाठी पूर्णपणे तयार आहे.अहवाल असे सूचित करतात की दोन वर्षांहून अधिक काळानंतर इशान किशन एकदिवसीय संघात ऋषभ पंतची जागा घेऊ शकतो. इशान किशनने भारतासाठी शेवटचा एकदिवसीय सामना ११ ऑक्टोबर २०२३ रोजी २०२३ च्या विश्वचषकादरम्यान अफगाणिस्तानविरुद्ध खेळला होता. इशान किशनची २०२६ च्या टी-२० विश्वचषकासाठीही निवड झाली होती. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये इशानने उल्लेखनीय काम गिरी केली आणि त्याच्या नेतृत्वात झारखंडला सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी जिंकली. आता तो विजय हजारे ट्रॉफी खेळत असून संघाचे नेतृत्वही करत आहे.



## टी २० वर्ल्ड कपपूर्वी शाहीन शाह आफ्रिदीला दुखापत

**नवी दिल्ली :** ज्या खेळाडूच्या जीवावर पाकिस्तानचा संघ वर्ल्ड कप जिंकण्याची स्वप्न पाहत होता, त्याच खेळाडूला आता मोठा दुखापत झाली असल्याचे समोर आले आहे. ही दुखापत गंभीर असल्यामुळे आता त्याला वर्ल्ड कपमध्ये खेळता येणार नसल्याचे दिसत असून त्यामुळेच पाकिस्तानचे धाबे दणाणले गेले आहेत.टी २० वर्ल्ड कप हा भारतात होणार आहे. पण पाकिस्तानचे सर्व सामने हे श्रीलंकेत खेळवले जाणार आहेत, भारत आणि पाकिस्तानचा सामनाही तिथेच होणार आहे. काही दिवसांपूर्वी चॅम्पियन्स ट्रॉफी झाली होती. या चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद हे पाकिस्तानकडे होते, पण पाकिस्तानध्ये खेळण्यास भारताने नकार दिला होता, त्यामुळे भारताचे सर्व सामने दुबईत झाले होते. भारत फायनलमध्ये पोहोचला आणि पाकिस्तानकडून फायनलचे यजमानपदही हिरावून घेतले. त्यामुळे आपल्या देशात फायनल होऊ शकली नाही, याचे दुःख पाकिस्तानला होते. त्यामुळे आता भारत टी २० वर्ल्ड कपचा यजमान असताना त्यांच्या देशातही फायनल खेळावायला द्यायची




नाही आणि त्यासाठी आपण अंतिम फेरीत पोहोचायचे, असे स्वप्न पाकिस्तान पाहत होता. पण पाकिस्तानचे हे स्वप्न आता धुळी मिळताना पाहायला मिळत आहे. कारण आता पाकिस्तानचा सर्वात महत्वाचा खेळाडूच दुखापतग्रस्त झाला आहे आणि या वर्ल्ड कपमध्ये खेळणार की नाही, याबाबत संभ्रम आहे.पाकिस्तानचा सर्वात महत्वाचा खेळाडू आहे तो शाहीन आफ्रिदी. पण आता आफ्रिदीला मोठी दुखापत झाल्याचे पाहायला मिळत आहे. आफ्रिदी हा सध्या ऑस्ट्रेलियात बिग बॅश लीग खेळत आहे. लीग खेळत असताना त्यच्या गुडघ्याला दुखापत झाली. त्याला सामना अर्धवट सोडून जावे लागले.

## आयुष म्हात्रेकडे दिली सर्वात मोठी जबाबदारी,

**नवी दिल्ली :** १९ वर्षांखालील आशिया कप स्पर्धेच्या फायनलमध्ये भारताला पाकिस्तानकडून लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला होता. यावेळी भारताचा कर्णधार होता तो आयुष म्हात्रे. पण या मानहानीकारक पराभवानंतरही बीसीसीआयने आयुषवर आपला विश्वास कायम दाखवला आहे. कारण आता बीसीसीआयने त्याला सर्वात मोठी जबाबदारी दिली आहे. त्याचबरोबर वैभव सूर्यवंशीबरोबरही बीसीसीआयने न्याय केला असून त्याच्यावरही विश्वास दाखवला आहे.आयुष म्हात्रे हा भारताच्या १९ वर्षांखालील संघाचे गेल्या काही दिवसांपासून नेतृत्व करत आहे. आयुषच्या नेतृत्वाखाली भारताने आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे, पण आयुष म्हात्रेला मात्र आतापर्यंत आपली छाप पाडता आलेली नाही. काही दिवसांपूर्वी १९ वर्षांखालील झालेल्या आशिया कप स्पर्धेत आयुषच्या नेतृत्वाखाली भारताने चांगली कामगिरी केली होती. भारताचा संघ अंतिम फेरीत पोहोचला होता. भारतासमोर यावेळी पाकिस्तानचे आव्हान होते. पण फायनलमध्ये पाकिस्तानने भारतावर मोठा विजय साकारला होता.

## स्मृती मानधनाने रचला इतिहास

**तिनुअनंतपुरम :** स्मृती मानधनाने पुन्हा एकदा मैदान गाजवल्याचे पाहायला मि ळाले. कारण स्मृतीने श्रीलंकेविरुद्धच्या चौथ्या टी २० सामन्यात एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केल्याचे पाहायला मि ळाले.स्मृती मानधनाने वनडे वर्ल्ड कप चांगलाच गाजवला होता. भारताकडून सर्वाधिक धावा या स्मृतीच्या नावावर होत्या, त्याचबरोबर ती या विश्वविजेत्या संघाची उप कर्णधारही होती. वनडे वर्ल्ड कप तिने चांगलाच गाजवला होता. त्यानंतर आता ती या मालिकेत फलंदाजीला उतरली. पण गेल्या काही सामन्यांत तिला लय सापडली नव्हती, पण या सामन्यात मात्र तिला चांगलात सूर गवसला होता आणि त्यामुळेच तिने एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.स्मृती मानधना या सामन्यात फलंदाजीला आली आणि सुरुवातीपासून तिने धडाकेबाज फटकेबाजी करायला सुरुवात केली. स्मृतीने एकामागून एक चौकार लगावले. स्मृतीने १४ चेंडूंत पाच चौकार लगावत आक्रमकपणे फलंदाजी केली होती. त्यामुळे स्मृती या सामन्यात मोठी खेळी साकारणार, असे दिसत होते. स्मृतीने चौथ्या षटकात दोन सलग चौकार लगावले होते आणि तिला पाचव्या सामन्यात हा महारेकॉर्ड रचण्याची संधी




होती.स्मृतीने आतार्यंत वनडे आणि टी २० क्रिकेटमध्ये दमदार फलंदाजी केली आहे. स्मृतीने या सामन्यात १० हजार धावा पूर्ण करण्याचा मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. यापूर्वी भारताकडून मिताली राजने ३१४ सामन्यांत १० हजार धावांचा पल्ला ओलांडला होता. पण स्मृतीने मात्र २८० सामन्यांतच ह मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. जगभरात कोणालाही एवढ्या कमी सामन्यांत १० हजार धावा करता आल्या नाही आणि त्यामुळे भारताकडून सर्वात जलद १० हजार धावा पूर्ण करण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड आता स्मृती मानधनाच्या नावावर असणार आहे. त्याम ुळे स्मृती मानधनाने भारतीय क्रिकेटमध्ये एक नवा अध्याय लिहिला आहे. त्याम ुळे आता भारताकडून सर्वात जलद १० हजार पूर्ण करण्याचा महा रेकॉर्ड आता स्मृती मानधनाच्या नावावर असणार आहे.

# १४ वर्षीय मुलगा सांभाळणार भारताची कमान; वैभव भारताचा कॅप्टन; आयुष म्हात्रे असताना असा निर्णय का?

**मुंबई :** वैभव सूर्यवंशीची सध्या खूप चर्चेचा विषय ठरत आहे. वैभव सध्या विजय हजारे ट्रॉफी खेळत आहे. नुकताच तो अंडर १९ आशिया कपच्या स्पर्धेत खेळला. आता पुन्हा एकदा भारतीय संघात त्याला स्थान मिळाले आहे. णपवशी १९ थीश्रव उींी नुकताच भारतीय संघ जाहीर झाला आहे. यामध्ये तरळलहरीं डीुरींरपीहळ स्थान मिळाले पण आता वैभव आणखी मोठी संधी मिळाली आहे.शनिवारी, बीसीसीआयच्या ज्युनियर निवड समितीने जानेवारीमध्ये होणाऱ्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यासह अंडर-१९ विश्वचषकासाठी संघाची घोषणा केली. आयुष म्हात्रे हा दीर्घकाळ चालणाऱ्या विश्वचषकात संघाचे नेतृत्व करणार आहे, तर वैभवला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी कर्णधारपद देण्यात आले आहे. विश्वचषकाआधी वैभवला एक मोठी संधी मिळाली आहे.बीसीसीआयने जारी केलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, १९ वर्षांखालील संघाचा नियमित कर्णधार म्हात्रे आणि उपकर्णधार विहान






मल्होत्रा सध्या दुखापतग्रस्त आहेत. दोघांनाही मनगटाच्या दुखापती आहेत. त्यांच्या दुखापतींवर काम करण्यासाठी त्यांना बेंगळुरूमधील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये रिपोर्ट करावे लागेल. या कारणास्तव, दक्षिण आफ्रिका मालिकेसाठी वैभवला कर्णधार आणि आरोन जॉर्जला उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. १५ जानेवारी रोजी झिम्बाब्वे आणि नामिबियामध्ये सुरू होणाऱ्या विश्वचषकापूर्वी आयुष आणि विहान तंदुरुस्त होण्याची अपेक्षा आहे आणि म्हणूनच, दोघांचीही या प्रमुख स्पर्धेसाठी निवड झाली आहे.दक्षिण आफ्रिका मालिका ३ जानेवारी रोजी सुरू होईल. दुसरा एकदिवसीय सामना एक दिवसानंतर, ५ तारखेला खेळला जाईल. तिसरा एकदिवसीय सामना ७ जानेवारी रोजी खेळला जाईल. त्यानंतर विश्वचषक होईल, जिथे आयुष आणि विहान परततील. दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी भारताचा अंडर-१९ संघ: वैभव सूर्यवंशी (कर्णधार), आरोन जॉर्ज (उपकर्णधार), वेदांत त्रिवेदी, अभिज्ञान कुंडू (यष्टीरक्षक), हरवंश सिंग (यष्टीरक्षक), आर.एस. अंबरीश, कनिष्क चौहान, खिलन ए. पटेल, मोहम्मद एनान, हेनिल पटेल, डी.दिपेश, किशन कुमार सिंग, उद्धव मोहन, युवराज गोहिल, राहुल कुमार.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# थलापती विजयचा इंडस्ट्रीला रामराम; राजकारणावर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय




**मुंबई :** दाक्षिणात्य सुपरस्टार थलापती विजयनं इंडस्ट्रीला रामराम केला आहे. अभिनेत्याचा शेवटचा चित्रपट 'जाना नायकन' जानेवारीमध्ये प्रदर्शित होणार आहे. यापूर्वी, २७ डिसेंबर रोजी मलेशियामध्ये 'जाना नायकन'चा ऑडिओ लाँच कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमादरम्यान अभिनेता भावूक झाला आणि त्यानं त्याचा शेवटचा चित्रपट वेदनादायक असल्याचं सांगितलं.विजय थलापतीनं अभिनय सोडून राजकारणावर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या वर्षी विजयनं त्याचा 'तमिलागा वेट्री कझगम' हा राजकीय पक्ष सुरू केला. आता, अभिनेता आगामी तामिळनाडू राज्य निवडणूक लढवण्याची तयारी करत आहे. पिंकव्हिलाच्या रिपोर्टनुसार, थलापती विजय त्याच्या शेवटच्या सिनेमाबद्दल बोलताना म्हणाला की, 'मला माहित नाही की, मी हे म्हणावं की नाही, पण माझा शेवटचा चित्रपट थोडा वेदनादायक आहे, मी काय करावं असं तुम्हाला वाटतंय?'थलापती विजयने राजकारणावर लक्ष केंद्रित करण्याच्या निर्णयावरही चर्चा केली. अभिनेता म्हणाला, 'माझ्यासाठी फक्त एकच गोष्ट महत्त्वाची आहे. लोक थिएटरमध्ये येतात आणि मला पाहण्यासाठी रांगेत उभे राहतात. म्हणूनच मी पुढील ३०-३३ वर्षे त्यांच्यासाठी रांगेत उभं राहण्यास तयार आहे.' थलापती विजय पुढे म्हणाला, 'मला पहिल्या दिवसापासूनच सर्व प्रकारच्या टीकेचा सामना करावा लागला आहे. पण माझे चाहते सुरुवातीपासूनच माझ्या पाठीशी उभे राहिले आहेत. मी वाळूचा किल्ला बांधण्याच्या आशेनं चित्रपटसृष्टीत प्रवेश केला होता, पण तुम्ही मला एक राजवाडा दिला.'

थलापती विजयचा शेवटचा चित्रपट ९ जानेवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट एच. विनोद यांनी दिग्दर्शित केला असून या चित्रपटात बॉबी देओल, पूजा हेगडे, ममिता बैजू, गौतम वासुदेव मेनन, प्रकाश राज, नारायण आणि प्रियामणी यांच्याही मुख्य भूमिका आहेत.दरम्यान, विजयच्या कामाबद्दल सांगायचं तर त्यानं 'मास्टर', 'लिओ', 'मर्सल', 'बिस्ट', 'थलायवा', 'वसीगरा', 'थेरी' यांसारख्या गाजलेल्या सिनेमांमध्ये काम केलं आहे.

# त्याला कोणाचीही पर्वा नाही...' अक्षय खन्नाबद्दल अभिनेत्याचं वक्तव्य चर्चेत


**मुंबई :** आदित्य धरच्या 'धुरंधर' या चित्रपटात पाकिस्तानी दरोडेखोर रहमानची भूमिका साकारणारा अक्षय खन्ना सध्या चर्चेत आहे. सर्वजण त्याचं कौतुक करत आहेत. त्याच्या अभिनयानं इतर कलाकारांनाही मागं टाकलंय. आता, अर्शद वारसीनंही अभिनेत्याच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल खुलासा केला आहे. त्यानं एका मुलाखतीत म्हटलं आहे की, अक्षय कोणाचीही पर्वा करत नाही. तो त्याच्याच जगात असतो.अर्शद वारसीने अक्षय खन्नासोबत 'हलचल' (२००४) आणि 'शॉर्ट कट' (२००९) या दोन चित्रपटांमध्ये काम केलंय. अशातच आता, 'द लल्लनटॉप' ला दिलेल्या मुलाखतीत, अर्शदला अक्षयबद्दल विचारण्यात आलं त्यावर अभिनेता म्हणाला, 'तो एक सिरीयस माणूस आहे. तो एक चांगला अभिनेता आहे. यात काही शंका नाही. पण तो त्याच्याच जगात असतो.'अर्शद वारसी पुढे म्हणाला, 'त्याला तुमची पर्वा नाही. त्याला कोणाचीही पर्वा नाही. त्याचं स्वतःचं आयुष्य आहे. तुम्ही माझ्याबद्दल काय विचार करता किंवा करत नाही, ही तुमची अडचण आहे. माझी नाही. तो स्वतःचं आयुष्य जगतो, स्वतःच्या पद्धतीने जगतो. त्याला कोणाचीही पर्वा नाही. त्याला पीआर वगैरेचीही पर्वा नाही. पहिल्या दिवसापासूनच असंच चाललं आहे.'अक्षय खन्ना सध्या 'दृश्यम ३' चित्रपटामुळे चर्चेत आहे. 'छावा' आणि 'धुरंधर' सारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांचा भाग असलेल्या या अभिनेत्यानं अजय देवगणच्या चित्रपटातून काढता पाय घेतलाय. त्यानंतर, 'दृश्यम ३'च्या निर्मात्यांनी अक्षयला कायदेशीर नोटीस पाठवली आणि दावा केला की, त्यांनी जयदीप अहलावटला कास्ट केलं असून तो अक्षयपेक्षा चांगला अभिनेता आणि चांगला माणूस आहे. 'बॉलिवूड हंगामा'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये कुमार मंगत अक्षय खन्नाबद्दल म्हणाले की, 'काही कलाकार मल्टीस्टारर चित्रपट करतात आणि जेव्हा ते चित्रपट हिट होतात तेव्हा ते कलाकार स्वतःला स्टार मानतात. अक्षयसोबत नेमकं हेच घडलं. त्याला वाटतं की, तो आता एक सुपरस्टार आहे. यशाची हवा त्याच्या डोक्यात गेलीये.'



***

# धुरंधरचा धुमाकूळ कायम

**मुंबई :** आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर' हा चित्रपट ५ डिसेंबर २०२५ रोजी प्रदर्शित झाला. पहिल्या दिवशी या सिनेमानं २८ कोटी रुपयांचा गल्ला जमवला. हा चित्रपट पहिल्याच दिवशी २८ कोटी रुपयांचा गल्ला जमवणारा ठरला. पहिल्या दिवशीचं या सिनेमानं विक्रम रचला असं नाही. कारण याआधी प्रदर्शित झालेल्या अनेक चित्रपटांनी पहिल्या दिवशीच्या कमाईपेक्षा खूपच जास्त कमाई केली आहे.जवान' आणि 'पठाण' तसंच 'छावा' सारख्या चित्रपटांनी पहिल्या दिवशी जोरदार कमाई केली. पण जसजसे दिवस पुढे सरकत गेले तसतसे 'धुरंधर' ने बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करण्यास सुरुवात केली. चित्रपटाच्या निर्मात्यांनाही सध्या मिळत असलेल्या यशाची कल्पनाही केली नव्हती. हा चित्रपट आतापर्यंतच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या टॉप ५ चित्रपटांच्या यादीत आला आहे.'धुरंधर' हा चित्रपट आता या यादीतील टॉप ३ मध्ये स्थान मिळवणारा पहिला हिंदी चित्रपट बनण्यास सज्ज असल्याचं दिसून येतंय. यापूर्वी, टॉप ४



कमाई करणारे चित्रपट सर्व दाक्षिणात्य चित्रपट होते. या सिनेमांचे रेकॉर्ड आता 'धुरंधर'ने मोडलेले दिसत आहेत.पहिल्या आठवड्यात २०७.२५ कोटी आणि दुसऱ्या आठवड्यात २५३.२५ कोटी कमाई करणाऱ्या या चित्रपटानं तिसऱ्या आठवड्यात १७२ कोटींची कमाई केली. २२ व्या दिवशी चित्रपटानं १५ कोटी कमाई केली, परंतु २३ व्या दिवशी हे कलेक्शन वाढलं असून या सिनेमानं २०.५ कोटी कमाई केली आहे. सॅकनिल्क रिपोर्टनुसार, २४व्या दिवशी संध्याकाळी ७:०५ वाजेपर्यंत, चित्रपटानं १८.२९ कोटी कमाई केली आहे.



# सुनिधीने वयाच्या १८व्या वर्षी पालकांच्या विरोधात जाऊन केलेला आंतरधर्मीय विवाह

**मुंबई :** अनेक बॉलिवूड स्टार्सनी त्यांच्या प्रोफेशनल आयुष्यात खूप उंची गाठली आहे. पण त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात चढ-उतार आले आहेत. आज अशाच एका सुप्रसिद्ध गायिकेबद्दल जाणून घेणार आहोत.सुप्रसिद्ध गायिका सुनिधी चौहाननं कुटुंबाच्या इच्छेविरुद्ध एका मुस्लिम पुरूषाशी लग्न केलं. पण, हे लग्न फक्त एक वर्ष टिकलं आणि नंतर ते वेगळे झाले. सुनिधीनं तिच्या वैयक्तिक आयुष्यात प्रचंड वेदना सहन केल्या आहेत. तिनं वयाच्या १८ व्या वर्षी लग्न केलं आणि १९ व्या वर्षी घटस्फोट घेतला.सुनिधी चौहान सध्या तिच्या करिअरच्या शिखरावर आहे. तिचं प्रत्येक गाणं रिलीज होताच हिट होतंय. शिवाय, ती अनेक टूर देखील करते. सुनिधीचे कॉन्सर्टमधील व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतात.सुनिधीनं वयाच्या १८ व्या वर्षी बॉबी खानशी लग्न केलं. बॉबी तिच्यापेक्षा १३ वर्षांनी मोठा होता. वेगवेगळ्या धर्मांमुळे सुनिधीच्या कुटुंबाला त्यांचं नातं मान्य नव्हतं. ते त्यांच्या लग्नासाठी तयार नव्हते, पण सुनिधीनं घरातल्यांच्या विरोधात जाऊन लग्न केलं. सुरुवातीला सगळं काही व्यवस्थित चाललं होतं, पण नंतर सुनिधी आणि बॉबीमध्ये मतभेद निर्माण झाले. लग्नाच्या फक्त एका वर्षातच त्यांचा घटस्फोट झाला.वयाच्या १९ व्या वर्षी लग्न मोडल्याच्या वेदना सहन केल्यानंतर, सुनिधीनं करिअरवर लक्ष केंद्रित केलं. त्यानंतर तिनं अनेक हिट गाणी दिली. अनेक वर्षे करिअरवर लक्ष केंद्रित केल्यानंतर, सुनिधीच्या आयुष्यात पुन्हा एकदा प्रेम आलं. २०१२ मध्ये तिनं संगीतकार हितेन सोनिकशी लग्न केलं. तिच्या दुसऱ्या लग्नापासून तिला एक मुलगा आहे. सुनिधी अनेकदा तिच्या पती आणि मुलासोबतचे फोटो सोशल मीडियावर शेअर करते.बॉलिवूड बबल'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये सुनिधी म्हणालेली की, 'या सगळ्या गोष्टींकडे मी वेगळ्या नजरेने बघितलं. मला त्यावेळी माझ्या पालकांची खूप साथ लाभली. त्यामुळे आता मला या सगळ्याचा त्रास होत नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात कठीण प्रसंग येत असतात. तुम्हाला स्वतःला प्रोत्साहन देत, स्वतःचा मित्र बनावं लागतं.'

# नववर्षाच्या पार्श्वभूमीवर अन्न व्यवसाय चालकांसाठी अन्न सुरक्षा मार्गदर्शक सूचना

**जनसंचलन/बुलढाणा**

नववर्षाच्या स्वागतासाठी दिनांक ३१ डिसेंबर रोजी हॉटेल, रेस्टॉरंट, ढाबे, फार्महाऊस, रिसॉर्ट तसेच इतर अन्न आस्थापनांमध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व दर्जेदार अन्न मिळावे, यासाठी सर्व अन्न व्यवसाय चालकांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन अन्न सुरक्षा विभागामार्फत करण्यात आले आहे. अन्न व औषध प्रशासनातर्फे ङ्खनववर्ष प्रण-सुरक्षित अन्न मोहीमम्फ राबविण्यात येत असून, या कालावधीत अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात येणार आहे. अन्न व्यवसाय चालकांनी अन्न तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी भांडी, उपकरणे, काउंटर व स्वयंपाकघर परिसर स्वच्छ व निर्जंतुक ठेवावा. कच्चे अन्नपदार्थ व शिजवलेले अन्न वेगवेगळ्या व स्वच्छ ठिकाणी साठवावे. स्टोअर रूम, कोल्ड स्टोरेज व कचरा साठवणूक क्षेत्र स्वच्छ ठेवून योग्य वायु वीजनाची व्यवस्था करावी. अन्नपदार्थ विक्रीसाठी वृत्तपत्र, छापील किंवा वापरात आलेला कागद वापरू नये. केवळ अन्नासाठी योग्य साहित्यच वापरणे बंधनकारक आहे. तेलाचा वारंवार अथवा अतिवापर टाळावा. खराब, जळलेले किंवा वारंवार वापरलेले तेल अन्न तयार करण्यासाठी वापरणे आरोग्यास घातक असल्याचे अन्न सुरक्षा विभागाने स्पष्ट केले आहे. अन्न तयार व विक्री करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी स्वच्छ कपडे, एप्रन, हेडकॅप व आवश्यकतेनुसार हातमोजे वापरणे आवश्यक आहे. पाणी शुद्ध व पिण्यायोग्य असावे तसेच त्याची नियमित तपासणी करावी. कीड, उंदीर, माशा यांचा प्रादुर्भाव होणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्न सुरक्षा परवाना किंवा नोंदणी प्रमाणपत्र आस्थापनेच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक आहे. पनीरच्या जागी चीज ॲनलॉग तसेच आइसक्रीमच्या नावाखाली ङ्खफ्रोजन डेसर्टम्फ विक्री करू नये. कच्च्या अन्नपदार्थांच्या खरेदीची बिले तपासणीदरम्यान अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना सादर करावी. शिळे, एक्स्पायर, कमी दर्जाचे किंवा मानवी सेवनास असुरक्षित अन्न पदार्थांची विक्री करू नये. अन्न सुरक्षा व मानके कायदा तसेच त्याअंतर्गत नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास संबंधित अन्न व्यवसाय चालकांवर कठोर कारवाई, दंड तसेच परवाना निलंबन किंवा रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. तपासणीनुसार ग्राहकांना स्वच्छ व दर्जेदार अन्न विक्री करणाऱ्या अन्न व्यवसाय चालकांचा पालकमंत्री यांच्याहस्ते प्रमाणपत्राद्वारे गौरव करण्यात येणार आहे. दरम्यान, नागरिकांनाही आवाहन करण्यात आले असून, अस्वच्छ, उघड्यावरील, शिळे तसेच वृत्तपत्रात विक्री होणारे अन्न पदार्थ खरेदी करू नये. अति रंगयुक्त अन्न पदार्थांचे सेवन टाळावे. अन्न पदार्थ कोणत्या माध्यमातून तयार करण्यात आले आहेत, याबाबत विक्रेत्याकडे विचारणा करून खरेदीचे बील घ्यावे, असे अन्न सुरक्षा विभागाने कळविले आहे.

# सहकार विद्या मंदिर शाळेत क्रिडा सप्ताह संपन्न...



**जनसंचलन/ डोणगाव**

येथील इंदिराबाई माधव सावजी सहकार विद्या मंदिर शाळेत दि २६ ते २८ डिसेंबर दरम्यान क्रिडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. दि २६ नोव्हेंबर रोजी डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे साहेब यांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी स्थानिक सल्लागार समितीचे सचिव जिवनसिंह दिनोरे सर होते. यावेळी उपाध्यक्ष दिलीप कळसकर, विजय काळे, केंद्रप्रमुख रायमुलकर, बुलढाणा अर्बन बँकेचे विभागीय व्यवस्थापक शिरसाट, डोणगाव शाखा प्रमुख वाहेकर, शाळेचे मुख्याध्यापक सुनील गाढे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवार यांनी केले, सरनाईक यांनी आभार मानले.

विविध खेळांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी चे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक, बुलढाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा कोमल झंवर, बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष डॉ. सुकेशजी झंवर तसेच मुख्याध्यापक, शिक्षक, पालक यांनी अभिनंदन केले. हा क्रीडा सप्ताह विद्यार्थ्यासाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला. विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीअतिशय मेहनत घेतली २६ नोव्हेंबरला शाळेच्या भव्य प्रांगणात सकाळी दहा वाजता मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व मशाल पेटवून क्रीडा सप्ताहाची सुरुवात झाली. यावेळी कार्यक्रमाचे उदघाटक नागरे साहेबांनी विद्यार्थ्यांना मैदानी खेळाचे महत्व पटवून दिले तसेच सोशल मीडियाचा वापर व त्या माध्यमातून होणारी फसवणूक टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिनोरे सरांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व सांगून शुभेच्छा दिल्या. तत्पूर्वी मुख्याध्यापक गाढे सरांनी प्रास्ताविकाद्वारे शालेय उपक्रम व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. त्यानंतर कबड्डी, खोखो, रस्सीखेच, लिंबू चमचा, संगीत खुर्ची असे सांघिक खेळ, लांब उडी, भालाफेक, गोळा फेक, मैदानी स्पर्धा, वैयक्तिक खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या गटांचे प्रतिनिधित्व करीत उत्कृष्ट खेळ कौशल्य दाखवले यावेळी विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह होता. मैदानावर खेळताना, धावताना त्यांच्या चेहऱ्यावरचा जोश आणि जिंकण्याची जिद्द स्पष्ट दिसत होती. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना आणि खेळाडू वृत्ती वाढण्यास मदत झाली.

# जिल्ह्यात नायलॉन मांजाच्या निर्मिती, वापर व विक्रीवर कायमस्वरूपी बंदी; जिल्हादंडाधिकाऱ्यांचे आदेश



**जनसंचलन/ बुलढाणा**

मकर संक्रांतीच्या कालावधीत पतंग उडविण्याचे प्रमाण वाढत असून त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या नायलॉन मांजामुळे मानवी जीवितास तसेच पशु-पक्ष्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होत आहे. नायलॉन मांजामुळे जखमी व मृत्यूच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण (संरक्षण) अधिनियमाअंतर्गत संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात नायलॉन मांजाची निर्मिती, वापर, विक्री व साठवणुकीवर कायमस्वरूपी बंदी घालण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, साठवणुकदार यांना नायलॉन मांजाची विक्री व साठवणुक करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस विभाग यांनी स्वतंत्ररित्या पथके तयार करुन आवश्यक ती कार्यवाही करावी. सदर आदेशाचे कोणतीही व्यक्ती वा संस्था यांनी उल्लंघन केल्यास पर्यावरण(संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ अन्वये शिक्षेस पात्र राहिल, असे जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशात नमूद आहे.



# किन्ही रोड शिवारात वृद्धाचा संशयास्पद मृत्यू...

जनसंचलन/ लोणार

तालुक्यातील किन्ही रोड शिवारात एका वृद्ध व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. या प्रकरणी लोणार पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृत्यूचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, समीर खान रियाजखान (२२, रा. लोणार) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांची किन्ही रोडवरील गट क्रमांक ३९३ मध्ये सुमारे दोन एकर शेती असून त्या शेतात केशर आंब्याची लागवड आहे. त्यामुळे ते प्राथमिक माहितीवरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची केली नोंद नियमितपणे शेतात पाहणीसाठी जात असतात. दरम्यान, प्रभाकर सखाराम जाधव (६९, रा. माळीपुरा, लोणार) हेही सदर परिसरात नेहमी ये-जा करीत असत.



२८ डिसेंबर रोजी सायंकाळी समीर खान शेतात पाहणीसाठी गेले असता, आंब्याच्या झाडाजवळ प्रभाकर जाधव हे झोपलेल्या अवस्थेत आढळून आले. त्यांनी आवाज देऊन तसेच जवळ जाऊन हलवण्याचा प्रयत्न केला; मात्र कोणतीही हालचाल दिसून आली नाही. हाताला धरून उठवण्याचा प्रयत्न करताच त्यांचा हात कडक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. यानंतर समीर खान यांनी तत्काळ आपल्या काकांना फोन करून घटनेची माहिती दिली. त्यानंतर लोणार पोलिस ठाण्यात जाऊन त्यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. फिर्यादीच्या माहितीच्या आधारे लोणार पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक धनंजय इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंती निमित्त श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालयात व्याख्यान संपन्न !

जनसंचलन/ नांदुरा



स्थानिक श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीद्वारा संचालित श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय येथे भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती दिनानिमित्त भाऊसाहेबांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य या विषयावर डॉ. अनंत शिरसाट यांचे व्याख्यान संपन्न झाले. भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त महाविद्यालयात विविध सांस्कृतिक आणि पारंपारिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाची सुरवात व्याख्यानाने करण्यात आली असून जिजामाता महाविद्यालयाचे माजी मराठी विभाग प्रमुख डॉ. अनंत शिरसाट यांनी भाऊसाहेबांच्या जीवनावर आणि त्यांच्या शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक तसेच संविधानात्मक सुधारणा कार्यावर आपल्या व्याख्यानातून प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य ॲड. शा. का. कळसकर होते. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. करमसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम पार पडला. संपूर्ण उत्सवाच्या उद्घाटनासाठी उद्घाटक म्हणून आमदार चैनसुख संचेती मलकापूर मतदार संघ हे प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मध्ये महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सिद्धार्थ मेश्राम, माजी प्रा. डॉ. भावसार मॅडम, प्रा. डॉ. देशमुख मॅडम, प्रा. डॉ. अलका मानकर ह्या लाभल्या. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य डॉ. करमसिंग राजपूत यांनी केले. अध्यक्षीय भाषणात ॲड. कळसकर यांनी महाविद्यालयाच्या उभारणी पासूनचा संघर्ष विषद करत भविष्यकालीन उद्दिष्टांबाबत महत्वाकांक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद पवार यांनी केले तर आभार प्रदर्शनाची जबाबदारी प्रा. अतुल इंदाने यांनी पार पाडली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

## अतिवृष्टी मुळे सानोटी परिसरातील शेतजमीन खरडून गेल्याने जिल्हाधिकारी यांना दिले निवेदन.



जनसंचलन/बुलढाणा

यावर्षी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने शेतकरी राज्याचे मोठे नुकसान झाले आहे. याच प्रश्वभूमीवर मेहकर तालुक्यातील सानोटी परिसरात झालेल्या अतिवृष्टी मुळे तेथील जमीन ही पूर्णपणे खरडून गेल्यामुळे येथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून येथील शेतकरी सरकार कडून नुकसान भरपाई न मिळाल्याने हवाल दिल झालेला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते की खरडून गेलेल्या जमिनीचे पूर्ण पैसे मिळतील परंतु येथील शेतकऱ्यांना ही मदत अद्यापपर्यंत मिळाली नाही. याआगोदर येथील शेतकऱ्यांनी मेहकर येथे तहसीलदार यांना सुद्धा निवेदन दिले तसेच कृषी अधिकारी यांनाही निवेदन दिले. परंतु येथील शेतकऱ्यांचा आरोप आहे की ते फक्त वारंवार उडवा उडवी ची उत्तरे देतात व कुठलीही भरपाई देत नाही.तसेच दोषीवर योग्य ती कारवाई करावी असेही त्यांनी याठिकाणी म्हटले आहे.त्यामुळे त्यांनी आज बुलडाणा येथे जाऊन जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४